**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

**महाविद्यालय विकास विभाग**

छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१ दुरध्वनी क्रमांक २५२९९३२, २५२२३९०

क्र.म.वि.वि./ 2560 दिनांक 15/१०/२०१८

# परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ११४ व निर्देश क्र. ८/२०१८ नुसार निरंतर संलग्निकरणासाठी (Continuation of affiliation) पुर्वी दिलेल्या संलग्निकरणाचा कालावधी संपण्यापुर्वी म्हणजे दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत शुल्क भरून अर्ज करावा लागतो. महाविद्यालयाचे निरंतर संलग्निकरणाचे अर्ज प्राप्त झाल्यावर त्यावर विद्यापीठाकडुन कार्यवाही होऊन महाविद्यालयांना नवीन सत्र सुरू होण्यापुर्वी संलग्निकरणाविषयी कळविणे निर्देशातील तरतुदीनुसार बंधनकारक आहे. परंतु स्थानिय चौकशी समित्या नियुक्त करणे, समित्यांच्या नियुक्तीविषयी महाविद्यालयांना कळविणे, समित्यांच्या महाविद्यालयांना भेटी होणे, समित्यांच्या अध्यक्षांकडुन अहवाल प्राप्त होणे, प्राप्त झालेले अहवाल छाननी समितीकडुन तपासुन घेणे, अहवाल विद्वत परिषदेसमोर सादर करणे व विद्वत परिषदेचा निरंतर संलग्निकरणाविषयीचा निर्णय महाविद्यालयांना कळविणे इत्यादी प्रक्रिया वेळेच्या आत पुर्ण करण्याचे दृष्टीने व महाविद्यालयांना निरंतर संलग्निकरण योग्य वेळी प्राप्त व्हावे यासाठी निरंतर संलग्निकरणाच्या प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर विहीत कालावधीत कार्यवाही पूर्ण करण्याच्या हेतुने मा. कुलगुरूंनी विद्वत परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सर्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत पुढीलप्रमाणे निरंतर संलग्निकरण प्रदान करण्यासाठी वेळापत्रक निश्चित केले आहे.

करिता सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी विद्यापीठाद्वारे निरंतर संलग्निकरणासाठी खालील प्रमाणे निश्चित केलेल्या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करावे. जी महाविद्यालये वेळापत्रकानुसार कार्यवाही घेणार नाहीत अशा महाविद्यालयांच्या नंतर प्राप्त होणा–या निवेदनांवर कोणतीही कार्यवाही घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**निरंतर संलग्निकरणाच्या प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | प्रक्रिया | अंतिम तारीख |
|---|---|---|
| १ | संलग्निकरणाचा कालावधी वाढवुन देण्याकरिता महाविद्यालयांकडून शुल्कासह आवेदन प्राप्त होण्याची अंतिम तारीख. | ३१ ऑगस्ट |
| २ | जे महाविद्यालय ३१ ऑगस्ट या अंतिम तारखेपर्यंत ऑनलाईन अर्ज करणार नाही त्यांना विलंबशुल्कासह अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख. | १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर |
| ३ | स्थानिय चौकशी समित्या नियुक्त करण्याकरिता अधिष्ठाता समितीची सभा आयोजीत करून गठीत समित्यांच्या याद्या प्राप्त करणे. | ३० ऑक्टोबर |
| ४ | महाविद्यालयांना व समितीच्या सदस्यांना विद्यापीठाकडुन स्थानिय चौकशी समितीच्या नियुक्तीविषयी पत्रे पाठविणे. | १५ नोव्हेंबर |
| ५ | स्थानिय चौकशी समित्यांनी महाविद्यालयांना भेटी देऊन अहवाल सादर करणे. | १६ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर |
| ६ | प्राप्त अहवाल छाननी समितीसमोर ठेवून छाननी समितीची प्रक्रिया पुर्ण करणे. | ३१ जानेवारी |
| ७ | छाननी समितीची संलग्निकरणास नकारात्मक शिफारस असलेल्या महाविद्यालयांना कळविणे. | १५ फेब्रुवारी |
| ८ | संलग्निकरणाच्या निर्णयासंबंधात महाविद्यालयाला आक्षेप असल्यास मा. कुलगुरूंकडे अपिल सादर करण्याची अंतीम तारीख. | २८ फेब्रुवारी |
| ९ | प्राप्त अपिलावर प्रक्रिया करणे व छाननी समितीच्या शिफारशीसह अहवाल विद्वत परिषदेसमोर किंवा १२(७) अंतर्गत मान्यता घेणे. | १५ मार्च |
| १० | संबंधीत महाविद्यालयांना विद्वत परिषदेचा निरंतर संलग्निकरणासंबंधीचा निर्णय कळविणे. | ३१ मार्च |

टिप:– अनु. क्र.५ मध्ये दर्शविल्यानुसार स्थानिय चौकशी समित्यांच्या भेटी दि. ३१ डिसेंबर पर्यंत आयोजीत करून विद्यापीठास अहवाल मिळणे अनिवार्य आहे. हया भेटी दि. ३१ डिसेंबर पर्यंत आयोजीत करण्यात आल्या नाहीत तर सदर महाविद्यालयास निरंतर संलग्निकरण करायचे नाही असे समजण्यात येईल. दि.३१ डिसेंबर नंतर समितीची भेट आयोजीत करण्यात येणार नाही व अहवाल सादर करण्याची लिंक ३१ डिसेंबर रोजी मध्यरात्री पासुन बंद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव(म.वि.वि.)
(अति.कार्य.)